**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**

**गुरुवार दिनांक ०९ ऑक्टोबर २०२५**

**ठळक बातम्या**

1. **लोकशाही मूल्यांवरचा विश्वास हा भारत आणि युनायटेड किंग्डम मधील भागीदारीचा पाया असल्याचं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचं प्रतिपादन.**
2. **राज्यातल्या जिल्हा परिषदा, पंचायत समित्या, नगरपरिषदा आणि नगरपंचायत निवडणुकांची प्रारूप मतदार यादी प्रसिद्ध.**
3. **मराठा आरक्षणाबाबत काढलेला शासन निर्णय रद्द करावा या मागणीसाठी उद्या नागपूरात मोर्चाचं आयोजन.**
4. **पूरग्रस्तांना मदत म्हणून १ दिवसाचा पगार मुख्यमंत्री सहायता निधीमध्ये जमा करण्याचं राज्य सरकारचं आवाहन.**
5. **हंगेरियन लेखक लास्झ्लो क्रॅस्नाहोर्काई यांना साहित्याचा नोबेल जाहीर.**

---------------------------------

पंतप्रधान नरेंद्र मोदी/स्टार्मर

भारत आणि युनायटेड किंग्डम नैसर्गिकरीत्या भागीदार असून लोकशाही, स्वातंत्र्य आणि कायद्याचं राज्य या मूल्यांवरचा विश्वास हा या भागीदारीचा पाया असल्याचं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. मोदी यांनी आज मुंबईत ब्रिटनचे पंतप्रधान किर स्टार्मर यांच्याशी द्विपक्षीय चर्चा केली. या बैठकीत व्यापार, संरक्षण आणि महत्वपूर्ण तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात भारत-ब्रिटन संबंध वाढवण्यावर भर देण्यात आला. यानंतर दोन्ही नेत्यांनी संयुक्त पत्रकार परिषदेला संबोधित केलं. स्टार्मर यांच्या नेतृत्वाखाली भारत आणि ब्रिटनच्या संबंधांमध्ये उल्लेखनीय प्रगती झाल्याचं पंतप्रधान मोदी यावेळी म्हणाले. दोन्ही देशांदरम्यान झालेल्या व्यापक आर्थिक आणि व्यापार कराराबद्दल पंतप्रधान म्हणाले..

***(होल्ड बाईट- पंतप्रधान नरेंद्र मोदी)***

***प्राइम मिनिस्टर स्टार्मर के नेतृत्व में भारत और यूके की रिश्तों में उल्लेखनीय प्रगति हुई है. इस साल जुलाई में मेरी यूके यात्रा के दौरान हमने ऐतिहासिक कॉम्प्रीहेन्सिव इकोनॉमिक ऍंड ट्रेड एग्रीमेंट सीटा पर सहमति बनाई. इस समझौते से दोनों देशों के इंपोर्ट कॉस्ट में कमी आएगी युवाओं के लिए रोजगार के नए अवसर***

*बनेंगे, व्यापार बढ़ेगा और इसका लाभ हमारे उद्योग तथा उपभोक्ता दोनों को ही मिलेगा।*

यानंतर पंतप्रधान मोदी आणि पंतप्रधान स्टार्मर मुंबईत सहाव्या ग्लोबल फिनटेक फेस्टमध्ये सहभागी झाले. भारत जगातील सर्वात मोठी लोकशाही असून भारतासोबतच्या भागीदारीतुन दोन्ही देश प्रगती करू शकतील असं प्रतिपादन स्टार्मर यांनी यावेळी केलं. देशातील डिजिटल इकोसिस्टम नवोन्मेष आणि समावेशासाठी जागतिक मानकं स्थापित करत आहे असं सांगून देशात दरमहा UPI द्वारे २५ लाख कोटी रुपयांचे २० अब्ज व्यवहार होत आहेत अशी माहिती मोदी यांनी यावेळी दिली.

---------------------------------

मतदार संकेतस्थळावर

राज्यातील जिल्हा परिषद, पंचायत समिती आणि नगरपरिषदा/नगरपंचायतींच्या निवडणुकांसाठी प्रारूप मतदार यादी काल प्रसिद्ध झाली आहे. मतदार आपलं नाव mahasecvoterlist.in/ या संकेतस्थळावर किंवा राज्य निवडणूक आयोगाच्या mahasec.maharashtra.gov.in/ संकेतस्थळावर शोधू शकतात. जिल्हा परिषद आणि पंचायत समितीची छायांकित प्रत संबंधित तहसील कार्यालयात, तर नगरपरिषद/नगरपंचायतीची प्रत त्यांच्या कार्यालयात उपलब्ध आहे. छायाप्रत घेण्यासाठी दोन रुपये प्रती शुल्क भरावे लागेल. प्रारूप आणि अंतिम मतदार यादीची PDF प्रत mahasecvoterlist.in/ObjectionOnClick/DownloadVoterlist या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

---------------------------------

आरक्षणाची सोडत

वाशिम जिल्ह्यातील सहा पंचायत समित्यांच्या सभापती पदाच्या आरक्षणाची सोडत जिल्हाधिकारी कार्यालयातील नियोजन भवन इथं जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. चक्राकार पद्धतीनं काढण्यात आलेल्या या सोडतीत मानोरा पंचायत समितीची जागा - अनुसूचित जाती महिला वर्गासाठी राखीव असून, रिसोड इथं महिला वर्ग, मंगरूळपीर इथं सर्वसाधारण, वाशिम इथं सर्वसाधारण महिला वर्ग तर कारंजा आणि मालेगाव इथं सर्वसाधारण वर्ग असं आरक्षण ठरलं आहे. हे आरक्षण अडीच वर्षांसाठी लागू राहणार आहे.

---------------------------------

सकल ओबीसी मोर्चा

मराठा आरक्षणाबाबत सरकारने दिनांक २ सप्टेंबर रोजी काढलेला शासन निर्णय रद्द करावा या मागणीसाठी उद्या नागपूरच्या यशवंत स्टेडियम इथं  सकाळी 11 वाजता मोर्चाचं आयोजन करण्यात आलं आहे. प्रत्येक समाजाला त्यांच्या हक्काचं आरक्षण मिळालं  पाहिजे. मराठा समाजाच्या स्वतंत्र आरक्षणाला  पाठिंबा आहे परंतु ओबीसीमधून आरक्षण द्यायला मात्र सकल ओबीसी संघटनांचा विरोध आहे. याच भूमिकेतून या मोर्चाचं आयोजन करण्यात आल्याचं काँग्रेस विधिमंडळ नेते विजय वडेट्टीवार यांनी सांगितलं.

***(होल्ड बाईट - विजय वडेट्टीवार)***

***2 सप्टेंबर चा जो काळा जीआर आहे तो जीआर रद्द झाला पाहिजे हे सर्व समाजाची एकमुखी मागणी आहे ज्या प्रमाणामध्ये मुसखोरी करण्यासाठी सरकारने जो जीआर. त्यामुळे जनतेमध्ये प्रचंड आक्रोश आहे आणि मी म्हणेल कि लाखो च्या संख्येत या मोर्चामध्ये लोक उद्या सहभागी होणार आहे. साडेअकरा ते 12 च्या दरम्यान मोर्चाची सुरुवात होईल महाराष्ट्रातून अनेक ओबीसीचे नेते या मोर्चामध्ये येणार आहे.***

उद्या यशवंत स्टेडियम येथून सुरु होणाऱ्या या मोर्चाची सांगता संविधान चौक इथं होणार आहे.

---------------------------------

चंद्रशेखर बावनकुळे

ओबीसी समाजातल्या विद्यार्थ्यांसाठी प्रत्येक जिल्हयात वसतिगृह, कार्यालय आणि अभ्यासिका उभारण्यासाठी सर्व जिल्हाधिकाऱ्यांना तातडीनं कार्यवाही करून जागा निश्चित करण्याचे निर्देश महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिले आहेत. यासंदर्भात काल मंत्रालयात झालेल्या बैठकीत ते बोलत होते. या बैठकीत अनेक जिल्हयांमधल्या जागा निश्चितीच्या प्रक्रियेला अंतिम स्वरूप देण्यात आलं असून ज्या जिल्हयांमध्ये जागा अद्याप निश्चित केलेली नाही, त्यांनी तातडीनं प्रस्ताव सादर करावेत, तसंच जिल्हयाधिकाऱ्यांनी जमीन हस्तांतरण प्रक्रियेसाठी मोजणी शुल्क माफ करावं, अशा सूचना बावनकुळे यांनी यावेळी दिल्या.

---------------------------------

मुख्यमंत्री सहायता निधी

राज्यातल्या पूरग्रस्तांना मदत म्हणून १ दिवसाचा पगार मुख्यमंत्री सहायता निधी मध्ये जमा करण्याचं आवाहन राज्य सरकारनं सर्व अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना केलं आहे. त्यासाठीचं संमतीपत्रक कार्यालयात उपलब्ध करुन देण्याचे आदेश सरकारनं काल जारी केले. राज्य सरकारच्या सेवेतले सर्व अधिकारी-कर्मचारी, विविध स्थानिक

स्वराज्य संस्था, सार्वजनिक उपक्रम, महामंडळातल्या अधिकारी - कर्मचाऱ्यांनाही त्यांचं एक दिवसाचं वेतन मुख्यमंत्री सहायता निधीमध्ये जमा करता येईल.

---------------------------------

जागतिक अंडी दिन

मानवी आहारात अंड्यांच्या पौष्टिक महत्त्वाला प्रोत्साहन देण्यासाठी सुरू असलेल्या अंडी जागरूकता मोहिमेअंतर्गत जागतिक अंडी दिनाच्या निमित्ताने ५००१ अंडी वापरून "अंडा भुर्जी" तयार करण्याचा जागतिक विक्रम करण्यात येणार आहे, अशी माहिती विद्यापीठाचे कुलगुरू डॉ.नितीन पाटील यांनी आज पत्रकार परिषदेत दिली.

***(होल्ड बाईट- नितीन पाटील- २६ सेकंद)***

***अंड जे आहे एक संपूर्ण आहार आणि संपूर्ण आहारापेक्षाही हा प्रथिनांचा एक संतुलित आहार म्हणून फार प्रसिद्ध आहे आणि त्याचा प्रचार आणि प्रसार हा लोकांमध्ये व्हावा आणि या अन्नाचा म्हणजे अंड्यांचा उपयोग जास्तीत जास्त लोकांनी करून त्यांचं आरोग्य आणि त्यांचे पोषण हे व्यवस्थित करून घ्यावं हा यामागचा प्रथम उद्देश आहे.***

महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ - माफसू, अंतर्गत असलेल्या नागपूर पशुवैद्यक महाविद्यालयाच्या कुक्कुट पालन शास्त्र विभागाच्या व्दारे तसंच भारतीय कुक्कुट विज्ञान संघटना - IPSA आणि राष्ट्रीय अंडी समन्वय समिती - NECC यांच्या सहकार्यान हा उपक्रम राबविण्यात येणार आहे. या मेगा कुकिंग कार्यक्रमाच नेतृत्व शेफ विष्णू मनोहर करतील. हा कार्यक्रम रविवार दिनांक 12 ऑक्टोबर रोजी सकाळी ८:०० वाजता नागपूर पशुवैद्यक महाविद्यालय, इथं आयोजित करण्यात आला असून या वर्षी जागतिक अंडी दिनाची थीम "द माईटी एग : पॅक्ड विथ नॅचरल न्यूट्रिशन" अशी आहे.

---------------------------------

साहित्यातील नोबेल

हंगेरियन लेखक लास्झ्लो क्रॅस्नाहोर्काई यांना 2025 साठी साहित्यातील नोबेल पारितोषिक जाहीर करण्यात आलं आहे. १० डिसेंबर रोजी त्यांना हा सन्मान प्रदान करण्यात येईल. रोमानियन सीमेजवळील एका शहरात १९५४ साली जन्मलेले लास्झ्लो त्यांच्या १९८५ साली प्रकाशित झालेल्या 'सतांतंगो' या पहिल्या कादंबरीमुळे नावारूपास आले. या वर्षी प्रकाशित झालेली त्यांची 'हर्श्त ०७७६९' ही कादंबरी, देशातील सामाजिक अशांतता अचूकपणे दर्शविण्यासाठी, एक महान समकालीन जर्मन कादंबरी म्हणून प्रसिद्ध झाली.

---------------------------------

सह-दुय्यम उपनिबंधक

नागपुरातील खामला येथील सह दुय्यम उपनिबंधक वर्ग २ कार्यालयात गैरव्यवहार आणि भ्रष्टाचाराच्या तक्रारींवर महसूल विभागाने अ. तु. कपले यांना महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियम १९७९ चा नियमांचा भंग केल्याप्रकारणी गैरप्रकारात सहभागी असल्याच्या प्राथमिक चौकशीनंतर निलंबित केल आहे. या संदर्भात शासन निर्णय महसूल विभागाने काढले आहे.

---------------------------------

विखे पाटील

मुंबई महानगरपालिका ही कुणाच्या एकाची नसून मराठी माणसाची आणि सर्व नागरिकांची आहे. त्यामुळं केंद्र आणि राज्य सरकारने नवी मुंबईसह मुंबईच्या विविध भागातील विकासकामांसाठी कोट्यावधी रुपयांचा निधी उपलब्ध करून दिला आहे, असं प्रतिपादन जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी केलं.

---------------------------------

भारत-दक्षिण आफ्रिका क्रिकेट

महिला क्रिकेटमध्ये, एकदिवसीय विश्वचषक स्पर्धेत आज विशाखापट्टणम इथं भारताचा सामना दक्षिण आफ्रिका संघासोबत होत आहे. भारतीय महिला संघ फलंदाजी करत असून 30 व्या शतकापर्यंत भारतीय संघाच्या 6 गडी बाद 114 धावा झाल्या आहेत.

---------------------------------

मध्य रेल्वे

मध्य रेल्वेच्या नागपूर विभागातून ‘अमृत भारत एक्सप्रेसच्या नवीन रेल्वे मार्गावर फेऱ्या सुरु झाल्या आहेत. 15294/15295 मुजफ्फरपूर-चारलापल्ली-मुजफ्फरपूर ही साप्ताहिक सुपरफास्ट एक्सप्रेस 14 ऑक्टोबर पासून धावणार आहे.

---------------------------------